# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990








लातूर वर्ष ५ वे अंक ४७ गुरूवार दि.२१ ऑगस्ट २०२५ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


## पंतप्रधान अन् मुख्यमंत्र्यासाठीच्या ‘त्या’ विधेयकावर काँग्रेस संतप्त ; म्हणाले,किती दुष्टचक्र!



गंभीर गुन्हेगारी आरोपांवरून पंतप्रधान, केंद्रीय मंत्री, मुख्यमंत्री किंवा मंत्री यांना अटक किंवा ताब्यात घेतल्यास त्यांना पदावरून काढून टाकण्यासाठी मोदी सरकार लोकसभेत आज एक विधेयक सादर करणार आहे. एका वृत्तसंस्थेनुसार, अधिकाऱ्यांनी ही माहिती दिली आहे. मात्र आता या विधेयकावर काँग्रेसकडून संतप्त प्रतिक्रिया देण्यात आली आहे.

आतापर्यंत, संविधानानुसार, दोषी ठरलेल्या लोकप्रतिनिधींनाच पदावरून काढून टाकता येत होते. परंतु नवीन प्रस्तावित विधेयकात असे म्हटले आहे की, जर पंतप्रधान, केंद्रीय मंत्री, मुख्यमंत्री किंवा राज्य किंवा केंद्रशासित प्रदेशाच्या मंत्र्यांना सलग ३० दिवस अटक करून ताब्यात ठेवले गेले तर त्यांना ३१ व्या दिवशी राजीनामा द्यावा लागेल अन्यथा ते आपोआप पदावरून काढून टाकले जातील असे मानले जाईल. चेवळ ञ्ीशीपाशपीं।

समोर आलेल्या माहितीनुसार अधिकाऱ्याने, गृहमंत्री अमित शाह आज लोकसभेत तीन मसुदा विधेयके सादर करतील. ही विधेयके आहेत – संविधान (१३० वी सुधारणा) विधेयक, केंद्रशासित प्रदेशांचे प्रशासन (सुधारणा) विधेयक आणि जम्मू आणि काश्मीर पुनर्रचना (सुधारणा) विधेयक. शाह हे तिन्ही विधेयक लोकसभा आणि राज्यसभेच्या संयुक्त समितीकडे पाठवण्याचा प्रस्तावही मांडतील, ज्यामध्ये पुढील संसदीय अधिवेशनाच्या शेवटच्या आठवड्याच्या पहिल्या दिवशी अहवाल सादर करण्याची तरतूद असेल. काँग्रेसची तीव्र प्रतिक्रिया चेवळ मध्यरात्री ही बातमी येताच सोशल मीडियावर वाद सुरू झाला.

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि सुप्रसिद्ध सर्वोच्च न्यायालयाचे वकील अभिषेक मनु सिंघवी यांनी तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली. त्यांनी सोशल मीडियावर एक पोस्ट करत, किती दुष्टचक्र! अटकेसाठी कोणतेही मार्गदर्शक तत्त्वे पाळली गेली नाहीत! विरोधी नेत्यांची अटक अविचारी आणि विसंगतपणे केली जात आहे. नवीन प्रस्तावित कायद्यानुसार, अटकेनंतर सध्याचे मुख्यमंत्री इत्यादींना लगेच काढून टाकले जाईल.असे त्यांनी म्हटले आहे. तसेच ते पुढे म्हणाले, विरोधी पक्षांना अस्थिर करण्याचा सर्वात सोपा मार्ग म्हणजे पक्षपाती केंद्रीय एजन्सींना विरोधी मुख्यमंत्र्यांना अटक करण्यासाठी सोडणे आणि निवडणुकीच्या क्षेत्रात त्यांना पराभूत करण्यात अपयशी ठरल्यानंतरही, त्यांना मनमानी अटक करून काढून टाकणे!! आणि सत्ताधारी पक्षाच्या कोणत्याही सध्याच्या मुख्यमंत्र्यांना कधीही स्पर्श केला जात नाही!!

## अपूर्ण अन् खड्डेमय रस्त्यांवर टोल नाही ; सर्वोच्च न्यायालयाचा मोठा निर्णय, प्रवाशांना दिलासा



वाहन मालक आणि सामान्य प्रवाशांसाठी एक मोठी दिलासादायक बातमी आहे. सर्वोच्च न्यायालयाने एक महत्त्वाचा निर्णय दिला आहे. न्यायालयाने याबाबत निर्णय देताना,जर राष्ट्रीय महामार्ग अपूर्ण असतील, खड्ड्यांनी भरलेले असतील आणि वाहतूक कोंडीमुळे ते प्रवासायोग्य झाले असतील तर त्यातून प्रवास करणाऱ्या प्रवाशांना टोल कर भरण्यास भाग पाडता येणार नाही असे म्हणत याठिकाणी टोल वसुली नसणार असल्याचे मोठा निर्णय दिला आहे. सर्वोच्च न्यायालयाने केरळ उच्च न्यायालयाच्या निर्णयाला कायम ठेवत हा आदेश दिला आहे, ज्यामध्ये त्रिशूर जिल्ह्यातील पलियाक्कारा टोल प्लाझा येथे टोल वसुलीवर बंदी घालण्यात आली होती. न्यायालयाची टिप्पणी मुख्य न्यायाधीश भूषण गवई, न्यायमूर्ती के विनोद चंद्रन आणि न्यायमूर्ती एन.व्ही. अंजारिया यांच्या खंडपीठाने हा निर्णय दिला. हा निर्णय देताना नागरिक वाहन खरेदी करताना पुरेसा कर भरतात. मग त्यांनी नाले आणि खड्ड्यांमधून जाण्यासाठी पुन्हा कर का भरावा?असा थेट सवालच न्यायालयाने केला आहे. एनएचएआय आणि सवलतीधारकांचे अपील फेटाळले न्यायालयाने एनएचएआय आणि सवलतीधारकांचे अपील फेटाळले, ज्यामध्ये रस्ते वापरकर्त्यांचे कल्याण आर्थिक नुकसानापेक्षा महत्त्वाचे आहे. असे म्हटले होते. एनएचएआयने काय म्हटले? रस्त्याच्या देखभालीसाठी टोल कर आवश्यक आहे असा युक्तिवाद राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण आणि सवलत देणाऱ्या कंपनीने न्यायालयात केला. तो थांबवल्याने दररोज ४९ लाख रुपयांचे नुकसान होईल, परंतु न्यायालयाने तो फेटाळून लावला आणि म्हटले की, जर त्याच रस्त्यावर प्रवास करण्यासाठी १२ तास लागतात, तर प्रवाशाला १५० रुपये का द्यावे लागतील? ठेकेदाराची जबाबदारी निश्चित केली जाईल सर्वोच्च न्यायालयाने असेही निर्देश दिले की, ब्लॅक स्पॉटच्या बांधकामासाठी जबाबदार असलेल्या कंत्राटदार मेसर्स पीएसटी इंजिनिअरिंग अँड कन्स्ट्रक्शन्सलाही जबाबदार धरले पाहिजे. न्यायालयाने केरळ उच्च न्यायालयाला देखरेख सुरू ठेवण्यास सांगितले आहे. टोल किती काळ निलंबित राहील? टोल निलंबन चार आठवडे किंवा वाहतूक सामान्य होईपर्यंत सुरू राहील.

## स्वंय घोषीत दलीत नेता, माजी नगर सेवकावर गुन्हे दाखल करावे – संदिपान तात्या हजारे. आर.पी.आय.बीड जिल्हा कार्याध्यक्ष.

### खा. बजरंग सोनवणे खंडणीखोर नगरसेवकाची तात्काळ पक्षातून अक्कलपट्टी करा–सुनील हिरवे



केज/प्रतिनिधी केज येथील सोशल मिडीया वर व्हायरल आडीओ क्लिप प्रकरणी केज रमाई नगर येथील गायरान प्रश्नी आर.पी. आय. पक्षाच्यावतीने पत्रकार परिषद आयोजीत केली होती संबंधीत पत्रकार परिषदेत बोलताना आर. पी. आय. पक्षाचे बीड जिल्हा कार्याध्यक्ष संदीपान (तात्या ) हजारे यांनी स्वंय घोषीत नेता, माजी नगर सेवकावर गुन्हे दाखल करावे असे सांगितले. केज शहरात दोन दिवसा पासून सोशल मिडीयावर व्हायरल आडीओ क्लिप मुळे खळबळ उडाली असून केज शहरातील रमाई नगर भागामध्ये शासकिय गायरान जमिनीवर दलीत समाजातील गोर गरीब, होतकरू अशा लोकांनी आपापली घरे तयार करून आपले वास्तव्य केले आहे, परंतु दलित समाजातील स्वंयघोषीत नेता, माजी नगरसेवक दलित समाजाची फसवणूक करत असून स्वतःच्या स्वर्थासाठी दलीत समाजाला वेठीस धरून फसवणूक करत असल्याचे संबधीत आडीओ क्लिप वरून निदर्शनास येत आहे रमाई नगर केज येथील गायरान जमिनी प्रकरणी समाजाच्या नावाने दलाली करणाऱ्या तसेच समाजाच्या नावाने स्वतःची राजकिय पोळी भाजून स्वार्थ करु पाहणाऱ्या स्वंयघोषीत दलीत नेत्यावर, माजी नगरसेवका वर गुन्हे दाखल करावेत असे आरपीआय कडून आयोजीत पत्रकार परिषदेत बोलताना आरपीआय चे बीड जिल्हा कार्याध्यक्ष संदीपन तात्या हजारे यांनी सांगितले. पुढे बोलताना आरपीआय चे केज तालुकाध्यक्ष, सुनिल हिरवे यांनी सांगितले कि, स्वंय घोषीत, दलित नेता, माजी नगरसेवक कपिल मस्के हा शरद पवार राष्ट्रवादी गटाचा कार्यकर्ता असून या गटाचे खासदार बजरंग साहेबांनी संबंधित, दलित समाजाच्या नावा खाली दलाली करून, समाजाला वेठीस धरून दलित समाजाची फसवणूक करणाऱ्या माजी नगर सेवकास, स्वंय घोषीत माजी नगरसेवकाची तात्काळ पक्षातून हाकलपट्टी करण्यात यावी अन्यथा पँथर स्टाईलने खासदार यांना सदर प्रकरणे जाब विचारला जाईल असा इशारा देखील हिरवे यांनी दिला आहे. आणि रमाई नगर केज येथील गोर गरीब, होतकरू दलित समाजास न्याय द्यावा, तसेच सामाजातील लोकांना त्या ठिकाणी घरकूल मंजूर करून घरे बांधून द्यावीत अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली. तसेच अशा समाजाच्या नावाखाली दलाली करणाऱ्या माजी नगरसेवकास तात्काळ पक्षातून काढून टाकावे व दलित समाजाचा रोष टाळावा अन्यथा दलित समाजाच्या रोशाला खासदार सोनवणे यांना सामोरे जावा लागेल असे बोलताना हिरवे यांनी स्पष्ट केले आहे.रमाई नगर येथील गरीब, असहाय्य दलित समाजास खासदार, बजरंग बप्पा यांनी न्याय द्यावा अन्यथा परिणामी प्रकरणाला खासदार सोनवणे जबाबदार राहतील आरपीआय चे केज तालुकाध्यक्ष सुनिल हिरवे यांनी केली. प्रसंगी दलित समाजासाठी संबंधीत स्वंयघोषीत दलित नेत्यावर गुन्हे दाखल करण्यासाठी रस्त्यावर उतरून, मोठा लढा उभा केला जाईल, गरीब समाजाच्या झोळीतील खाणाऱ्यावर आरपीआयच्या माध्यमातून दलित समाजासाठी त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी झुंजार पणे लढा देणार असल्याचे त्यांनी सांगीतले तसेच संबधील दलाल असणाऱ्या स्वंय घोषीत दलीत नेता, माजी नगरसेवक कपिल मस्के याच्यावर गुन्हे दाखल होत नाहीत तोपर्यंत आरपीआय च्या माध्यमातून दलित समाजासाठी लढा देवू असे त्यांनी सांगितले. तसेच आरपीआय च्या सर्व पदाधिकारी यांनी आपापल्या प्रतिक्रिया देवून दलित समाजाच्या अन्याया विरुद्ध एकजूटीने लढा देण्याचे सांगितले यावेळी आरपीआय चे नवनाथ तपसे मराठा आघाडी रिपाईचे बीड जिल्हाध्यक्ष, महादेव ढवारे मराठा आघाडी रिपाईचे केज तालुकाध्यक्ष, सुरेश बचुटे रिपाईचे जेष्ट नेते, देवानंद वाघमारे रिपाईचे केज तालुका उपाध्यक्ष, अमोल मस्के रिपाईचे शहर प्रमुख, चंद्रकांत नाना मस्के रिपाईचे जेष्ठ नागरीक तसेच दिनकर मस्के यांसह रिपाईचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## लातूर जिल्ह्यात युरिया खताचा पुरेसा साठा उपलब्ध; टंचाई नाही

लातूर, दि. २० (जिमाका): जिल्ह्यात सध्या ३४ हजार ३०५ मे. टन रासायनिक खते उपलब्ध असून, यापैकी ५४६ कृषी सेवा केंद्रांमध्ये ७ हजार १७ मे. टन युरिया खत उपलब्ध आहे. यामुळे जिल्ह्यात खतांची टंचाई नाही. शेतकऱ्यांना खतसाठ्याची माहिती https://adozplatur.blogspot.com/p/box-sizing-border-box-margin-0-padding.html?m=1 या ब्लॉगवर दररोज अद्ययावत केली जाते.

सोयाबीन पिकाचे जिल्ह्यात ४ लाख ८५ हजार १८२ हेक्टर क्षेत्र असून, हे पीक फुले लागणे ते शेंगा भरणे अवस्थेत आहे, त्यामुळे युरियाची गरज नाही. युरियाच्या वाढीव दराने विक्री किंवा टंचाईबाबत कोणतीही लिखित तक्रार नाही. जिल्ह्यात ७१३ कृषी सेवा केंद्रांची निरीक्षकांमार्फत तपासणी झाली असून, अनियमितता आढळलेल्या १५ दुकानांचे परवाने काही कालावधीसाठी निलंबित करण्यात आले आहेत. तसेच एका दुकानाचा परवाना कायमस्वरूपी रद्द करण्यात आला आहे.

युरिया खताचा पुरेसा साठा उपलब्ध आहे. वाढीव दराने विक्री किंवा सक्तीच्या लिंकिंगच्या तक्रारी असल्यास शेतकऱ्यांनी संबंधित तालुका कृषी अधिकारी, जिल्हा परिषद कृषी विभाग किंवा जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालयात या तक्रारी नोंदवाव्यात, असे आवाहन कृषी विभागाने केले आहे.

## भारतीय हॉकी संघात व्यंकटेश केंचे यांची निवड झाल्याबद्दल आ. कराड यांच्याकडून अभिनंदन



लातूर : – लातूर जिल्ह्याचे सुपुत्र चाकूर तालूक्यातील मौजे घरणी येथील व्यंकटेश धनंजय केंचे याची भारतीय हॉकी संघात युरोप दौऱ्यासाठी निवड झाली या यशाबद्दल भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी त्यांचा यथोचित सत्कार करून अभिनंदन केले व हॉकी स्पर्धेत यशस्वी होऊन लातूर बरोबरच देशाचेही नाव उंचवावे अशा शुभेच्छा दिल्या.

चाकूर तालुक्यातील मौजे घरणी येथील व्यंकटेश धनंजय केंचे यांनी राष्ट्रीय पातळीवरील हॉकीच्या सामन्यात दमदार प्रदर्शन केल्याने त्यांची भारतीय हॉकी संघात निवड झाली ही निवड केवळ चाकूर तालुक्यासाठीच नव्हे तर लातूर जिल्ह्यासाठी अभिमानाची आणि आनंदाची बाब आहे.

येत्या काळात दिं ८ जुलै २०२६ ते दिं २० जुलै २०२६ दरम्यान १३ दिवसांचा युरोप दौरा आहे. या दौऱ्यात व्यंकटेश केंचे हा आयर्लंड, नेदरलँड, बेल्जियम, फ्रान्स आणि अर्जेंटिना येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये भारताचे प्रतिनिधीत्व करणार आहेत. लातूर ग्रामीणचे आमदार तथा भाजप नेते श्री रमेशआप्पा कराड यांनी व्यंकटेश केंचे यांचा यथोचित सत्कार करून या निवडीबद्दल अभिनंदन केले व हॉकी स्पर्धेत यशस्वी होऊन लातूर बरोबरच देशाचेही नाव उंचवावे अशा शुभेच्छा दिल्या. यावेळी मुलाचे वडील धनंजय केंचे, आई स्वर्णा केंचे, आजी कांताबाई केंचे, चुलते विजय केंचे, चुलती लताबाई केंचे, लहान भाऊ गणेश केंचे, त्याचबरोबर भाजपाचे वसंत करमुडे, डॉ. बाबासाहेब घुले, रामराव मोरे, गोविंदराव घुले, भाऊसाहेब गुळबिले, लक्ष्मण खलंग्रे यांच्यासह अनेक जण होते.

## पुण्यातील एकतानगर जलमय; अजित पवारांची पहिली प्रतिक्रिया, प्रशासनाला दिल्या महत्वाच्या सूचना



गेल्या दोन दिवसांपासून सुरू झालेल्या पावसाने राज्यासह पुण्यातही थैमान घातलं आहे. पुणे शहर आणि ग्रामीण भागात पावसाने कहर केला आहे. आज सकाळपासून पावसाने उसंती घेतली असली तरी धुव्वादार झालेल्या पावासामुळे मोठ्या प्रमाणावर खडकवासाला धरणातून विसर्ग करण्यात आला आहे.

यामुळे मुळामुठा नदीचं पात्र दुथडी भरून वाहू लागलं आहे. तसेच पावसाचे पाणी एकतानगर भागात शिरलं आहे. यामुळे आता एनडीआरफच्या जवानांकडून रेस्क्यू ऑपरेशन राबवून नागरिकांना सुरक्षित स्थळी हलविण्यात येत आहे. अशातच आता यावर राज्याचे उपमुख्यमंत्री आणि पुण्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी प्रतिक्रिया दिली आहे. पुण्यातील घाटमाथा परिसरातील नागरिकांनी काळजी घेणे गरजेचे असून, ज्या ठिकाणी पाणी शिरलं आहे तिथली नागरिकांना सुरक्षित स्थळी हलविण्यात येत आहे, त्यामुळे नागरिकांनी गरज असेल तरच बाहेर पडा, असं आवाहन अजित पवार यांनी केलं आहे. हवामान विभागाने वर्तवलेल्या अंदाजानंतर आम्हीही वेदर रिपोर्ट पाहतो आणि त्यानुसार सूचना करत असल्याचे देखील पवार यावेळी बोलताना म्हणाले.

नेमकं काय म्हणाले अजित पवार? ज्यांना खूपच गरज असेल तरच बाहेर पडा, अशा प्रकारचे आवाहन आम्ही करतो याचं कारण म्हणजे आम्ही हे कशावर बोलतो तर आम्ही वेदर रिपोर्ट पाहतो आणि त्यानुसार परिस्थिती पाहून सांगतो. पुढचे काही दिवस पावसाचे असणार आहेत. पुण्यातील खडकवासला धरणातील पाणीसाठ्यात वाढ झाली आहे, यांचं कारण म्हणजे वरची सगळी धरणातून पाणी सोडल्यामुळे खडकवासला धरणातील पाणी साठ्यात वाढ झाली आहे.यामुळे आता पुण्याचे आयुक्त, जिल्हाधिकारी आणि बाकीची यंत्रणांना अलर्ट राहिला सांगितलं आहे. काही भागातील नागरिकांना स्थलांतरित करण्यात आलं आहे. पूल पाण्याखाली गेले आहेत, कोणीही धोका पत्करू नये असं आवाहन अजित पवारांनी केलं आहे. तर विसर्गात वाढ करणार आज सकाळी ९ वाजता ३९,००० क्युसेक विसर्ग खडकवासाला धरणातून सुरू आहे. पुणे ग्रामीण आणि शहरी भागांना पाणीपुरवठा करणाऱ्या चारही धरणातील पाण्यासाठ्यात वाढ झाली आहे. त्यामुळे या चारही धरणातून पाण्याचा विसर्ग वाढवण्यात आला आहे. पावसाचा जोर आणि धरणातील पाणी साठ्यात अशीच जर वाढ होत राहिली तर आणखी विसर्ग करण्यात येणार असल्याचं सांगण्यात आलं आहे.

# संपादकीय

## अलास्का भेटीचे नाट्य...

अलास्कामध्ये झालेल्या अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांची बहुप्रतीक्षित शिखर बैठक एक महत्त्वाचा टप्पा ठरेल, अशी अपेक्षा होती. विशेषतः रशिया-युक्रेन युद्धाच्या समाप्तीबाबत काही ठोस प्रगती होईल का, या प्रश्नाकडे संपूर्ण जगाचे लक्ष लागले होते; परंतु बैठकीचा निकाल निराशाजनक ठरला. प्रारंभी दोन्ही नेत्यांनी हास्यविनोद, हस्तांदोलन आणि ट्रम्प यांच्या लिंमोझिनमधील संयुक्त प्रवासातून आपुलकीचे वातावरण तयार केले. अमेरिकन हवाई दलाच्या विमाने केलेल्या फ्लायपास्टसारख्या लष्करी थाटामाटाने या स्वागताला आणखी भव्यता प्राप्त झाली. दोन्ही नेत्यांनी चर्चेला 'सकारात्मक', 'थेट' आणि 'प्रामाणिक' अशी विशेषणे दिली. पुतीन यांनी सांगितले की, काही 'सामंजस्य' घडून आले. तसेच त्यांनी युरोप व युक्रेनला आवाहन केले की, या प्रारंभीच्या प्रगतीची नासधूस करू नये; मात्र ट्रम्प यांनी याउलट विधान केले. त्यांनी स्पष्टपणे सांगितले की, कोणताही करार झाला नाही आणि पुढे जाण्यापूर्वी त्यांना झेलेन्स्की व युरोपीय नेत्यांचा सल्ला घ्यावा लागेल. अशारीतीने ट्रम्प यांनी चर्चेची जबाबदारी युक्रेनवर ढकलली. संयुक्त पत्रकार परिषदेत दोन्ही नेत्यांनी केवळ थोडक्यात विधान केले आणि कोणतेही प्रश्न स्वीकारले नाहीत.

युक्रेनच्या प्रश्नापलीकडे जाऊन ट्रम्प यांनी वैयक्तिक कूटनीतीचेही दर्शन घडवले. त्यांनी असा चकित करणारा दावा केला की, चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांनी त्यांना आश्वस्त केले आहे की, त्यांच्या कार्यकाळात चीन तैवानवर हल्ला करणार नाही. ट्रम्प यांनी पुतीन यांना मेलानिया ट्रम्प यांचे एक खासगी पत्रही दिले, ज्यामध्ये युक्रेन व रशियातून अपहरण झालेल्या मुलांचा उल्लेख होता. प्रत्युत्तरादाखल पुतीन यांनी द्वितीय महायुद्धात लेन-लीज मोहिमांमध्ये मृत्युमुखी पडलेल्या सोव्हिएत वैमानिकांच्या स्मशानभूमीवर पुष्पांजली अर्पण केली. या सर्व प्रतीकात्मक हालचालींमुळे चर्चेला ऊब व नाट्यमयता मिळाली; पण ठोस तोडगा कुठेच दिसून आला नाही. भारतासाठी ही शिखर बैठक विशेष महत्त्वाची होती.

कारण, ट्रम्प भारत रशियाकडून मोठ्या प्रमाणावर होणार्या तेल खरेदीवर नेहमीच टीका करीत आले आहेत. अमेरिकेच्या अर्थमंत्र्यांनी तर एवढेही सूचित केले होते की, अलास्कामधील चर्चा निष्फळ ठरली, तर अमेरिका भारतावर डबल शुल्क लादू शकेल. भारताला दुहेरी मार बसण्याची धमकी दिली जात होती, तिथेच रशियाकडून सर्वाधिक तेल खरेदी करणार्या चीनवर ट्रम्प यांनी कोणतीही दंडात्मक कारवाई सुचवली नाही. उलट त्यांनी बैठकीनंतर असे विधान केले की, आता चीनबद्दल विचार करण्याची गरज नाही. कारण, पुतीन यांच्यासोबतची चर्चा समाधानकारक झाली आहे. हे दुहेरी धोरण भारतासाठी धक्कादायक आहे.

सध्या भारतीय सरकारी तेल कंपन्या रोज सुमारे २० लाख बॅरल रशियन तेल विकत घेत आहेत आणि त्यावर बंदी घालण्याचा कोणताही सरकारी आदेश नाही, तरीसुद्धा ट्रम्प यांनी उघडपणे दावा केला की, भारताने रशियन तेल घेणे थांबवले आहे. त्यामुळे प्रश्न उपस्थित होतो की, ट्रम्प जाणूनबुजून भारतावर दबाव आणण्यासाठी चुकीचे विधान करीत आहेत का, की त्यांना प्रत्यक्ष परिस्थितीची माहितीच नाही. भारतासाठी परिस्थिती अत्यंत गंभीर आहे. ट्रम्प यांनी दुप्पट शुल्क लागू केले, तर भारताला ५० टक्के अतिरिक्त शुल्काचा फटका बसू शकतो. याचा फटका शेती, उत्पादन व इतर अनेक उद्योगांना बसणार आहे; परंतु ट्रम्प यांनी केलेल्या विधानाप्रमाणे हे शुल्क आतासाठी टाळले, तर भारताला काहीसा दिलासा मिळू शकतो.

# बळीराजावर संकट

राज्याच्या विविध भागांत सुरू असलेल्या मुसळधार पावसाचा मोठा फटका शेतकर्यांना बसला असून, चौदा लाख एकर क्षेत्रातील पिके बाधित झाली आहेत. मागील चार दिवसांपासून मुंबईत मोसमी पाऊस सक्रिय झाला. शुक्रवारी सकाळी साडेआठ ते शनिवारी सकाळी साडेआठ दरम्यानच्या २४ तासांत शहरात पाच वर्षांतील सर्वाधिक म्हणजेच २४४.७ मि.मी. पावसाची नोंद झाली. या पावसाने मुंबई पुन्हा तुंबली. महापालिकेचे प्रयत्न उघड्यावर पडले. दोन दिवस महानगर अक्षरश: बेहाल झाले. सरकारी आणि खासगी संस्था, शाळांना सुटी देण्याची वेळ आली. सारे जनजीवन कोलमडले. सर्वसामान्य माणसाचे मोठे हाल झाले. मुंबईसह संपूर्ण राज्यात पावसाने ऑगस्ट महिन्याच्या सुरुवातीपासून विश्रांती घेतली होती. त्यानंतर गेल्या शुक्रवारपासून राज्यात पुन्हा पाऊस सक्रिय झाला.

मुंबईला पाणीपुरवठा करणार्या धरणांच्या पाणलोट क्षेत्रात आता पाणीसाठा ९० टक्क्यांवर पोहोचला. गेल्या वर्षीच्या तुलनेत पाणीसाठा तीन टक्के कमी आहे. ठाणे जिल्ह्याची तहान भागवणारे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे बारवी धरण ओसंडून वाहू लागल्यामुळे या जिल्ह्याची पाणी चिंता मिटली. राज्यात सोमवारी एकाच दिवसात एक हजाराहून अधिक गावांत अतिवृष्टी झाली. सोळा जणांचा बळी गेला. नांदेड जिल्ह्यातील मुखेड तालुक्यातील ढगफुटीसदृश पावसामुळे सात गावांत पूरस्थिती निर्माण झाली. मराठवाड्याच्या अनेक भागांत आभाळ फाटल्याची स्थिती आहे.

विदर्भालाही तडाखा बसला. राज्य आपत्ती प्रतिसाद दल (एसडीआरए) व लष्कराच्या मदतीने बचावकार्य सुरू असून, पथकाने २९३ नागरिकांची सुटका केली. पश्चिम महाराष्ट्रातील कोयना, चांदोली, राधानगरी ही धरणे भरली असून धरण क्षेत्रात अतिवृष्टी सुरू आहे. पंचगंगा यंदाच्या हंगामात पाचव्यांदा पात्राबाहेर पडली असून ती इशारा पातळीकडे जात आहे. कोयना धरणातून ३३ हजार क्युसेकचा विसर्ग सुरू झाला असून, राधानगरी धरणाचे सर्व दरवाजे उघडले आहेत. याचा अर्थ, सर्वत्र पुराचे संकट असून निसर्गापुढे माणसाचे काही चालत नाही असे म्हणून हातावर हात धरून बसता येणार नाही. सातत्याने अतिवृष्टी होते त्यावेळी धरणांतून किती पाणी सोडायचे, याचे विचारपूर्वक नियोजन करावे लागते.

प्रत्येक ठिकाणच्या मुख्य अभियंत्याने धरणाच्या ठिकाणी २४ तास राहावे, अशा सूचना शासनाने दिल्या आहेत. महापुरास कारणीभूत ठरणारे कर्नाटकातील अलमट्टीसह कोयना, राधानगरी, वारणा धरणातील विसर्गाच्या समन्वयामुळे आणि प्रशासनाच्या सतर्कतेमुळे कोल्हापूर, सांगलीत अजून तरी पूरस्थिती उद्भवलेली नाही; मात्र येणारे काही दिवस कसोटीचे ठरतील. अरबी समुद्रात समुद्रसपाटीला समांतर कमी दाबाचा पट्टा सक्रिय झाल्याने मुंबईपासून सिंधुदुर्गपर्यंत उंच ढगांची निर्मिती होत आहे. म्हणूनच कमी वेळेत जास्त पाऊस पडत आहे. घाटमाथ्यावरही हेच चित्र आहे. बंगालच्या उपसागरात तीव्र कमी दाबाचे क्षेत्र निर्माण झाले असून, त्याची तीव्रता वाढून त्याचे रूपांतर 'डिप्रेशन'मध्ये होणार आहे. मराठवाड्यात सर्वसाधारणपणे १५ ते २० मि.मी. पाऊस उत्तम मानला जातो; मात्र गेल्या काही दिवसांच्या आकडेवारीनुसार, अनेक भागांत तेथे ४० ते ६० मि.मी. पावसाची नोंद झाली. काही ठिकाणी तर पाऊस १०० मि.मी.च्याही पुढे गेला.

नांदेडमधील लेंडी धरणावर सुरू झालेल्या घळभरणीच्या कामामुळे संकट ओढवल्याचे सांगितले जात आहे. या घटनेची शासनाने चौकशी केली पाहिजे. विदर्भात पूर्वी अत्यल्प पाऊस असे. आता याच्या उलट चित्र आहे. अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर सरकारने महसूल, आपत्कालीन व पोलीस यंत्रणेला सतर्कतेचे आणि मदतकार्यात सहभागी होण्याचे तसेच पिकांच्या नुकसानीचे पंचनामे करण्याचे आदेश दिलेत. पंचनामे लवकरात लवकर होऊन शेतकर्यांना तत्काळ मदत मिळण्याची गरज आहे. राज्यात २५ ऑगस्टपर्यंत पुन्हा अतिवृष्टीची शक्यता हवामान खात्याने वर्तवली असून, १५-१६ जिल्ह्यांत रेड अलर्ट, तर काही जिल्ह्यांत ऑरेंज अलर्ट दिला आहे.

राज्यात गेल्यावर्षी ऑक्टोबरमध्ये मान्सूनोत्तर पावसाने काढणीस आलेल्या खरीप पिकांचे तसेच भाजीपाला, फळभाज्यांसह फळबागांचे प्रचंड नुकसान झाले; पण शासकीय यंत्रणांकडून पीक नुकसानीचे पंचनामेच होत नसल्याचे व काही ठिकाणी त्यांची गती संथ असल्याचे दिसून आले. पीक नुकसान कळवण्यासाठी कंपन्यांकडूनही दाद लागत नव्हती. अनेकांना सर्व्हर डाऊनचा फटका बसत असल्याने शेतकर्यांची कोंडी झाली होती. यंत्रणा निवडणुकीच्या कामात असल्याने बर्याच ठिकाणी पंचनाम्यांबाबत अधिकारी हात वर करत होते. काढणी केलेल्या शेतातील पिकांच्या नुकसानीच्या पंचनाम्यांबाबत टाळाटाळ, पिकांचे नुकसान तर होत आहे; पण कोणाकडूनच पंचनामा नाही, काही भागांत विमा कंपन्यांना फोन केल्यास प्रतिसादच मिळत नाही, सर्व्हर डाऊनमुळे ॲपला प्रतिसाद नाही यासारख्या अनेक तक्रारींचे निरसन झालेले नाही. घरांचे नुकसान, माणसे व पशुधनाचे मृत्यू याबाबत नुकसानीच्या भरपाईचे अधिकार जिल्हाधिकार्यांना दिले असून त्यामुळे या कामाला गती येईल. घरांचे नुकसान झालेल्यांना तात्पुरते निवारे उभारण्याचे तसेच आपद्ग्रस्तांना जेवण आणि पिण्याचे स्वच्छ पाणी पुरवण्याचे आदेशही देण्यात आले आहेत.

ओल्या दुष्काळामुळे अनेक भागांत शेती पाण्याखाली गेली, तर काही ठिकाणी पावसाच्या अभावामुळे पिके करपून गेली. गेल्या काही महिन्यांत शेतकर्यांच्या आत्महत्याही वाढल्या असून, बेभरवशाच्या निसर्गामुळे जगायचे तरी कसे, असा प्रश्न बळीराजाला पडला आहे. पीक विमा कंपनीने गेल्यावर्षी खरीप हंगामात पंचनामे न करताच प्रकरणे अपात्र ठरवल्याच्या तक्रारी अकोला जिल्ह्यात समोर आल्या होत्या. या स्थितीत नवे कृषिमंत्री दत्ता भरणे जबाबदारी चोखपणे पार पाडतील ही आशा आहे. विमा कंपन्या तसेच सरकारमार्फत अतिवृष्टीग्रस्त शेतकर्यांना वेळेवर मदत पोहोचवण्यासाठी महसूल तसेच कृषी विभागास कामाला लावावे लागेल. या कामात चुकारपणा करणार्या अधिकार्यांचाच पंचनामा करण्याची वेळ येऊ नये, हे सरकारने पाहिले पाहिजे. शेतकरी आणि सामान्य जनतेची काळजी घेतलीच गेली पाहिजे. प्रशासनाने खबरदारी बाळगून संकटग्रस्त भागात मदत आणि बचावकार्य राबवताना तत्काळ उपायोजनाही केल्या पाहिजेत. जीवित आणि वित्तहानी टाळण्याला प्राधान्य दिले पाहिजे.

# आयोगाचे प्रति-आव्हान

निवडणूक म्हणजे लोकशाहीचा सर्वात मोठा सोहळा, असे म्हटले जाते. भारतासारख्या खंडप्राय देशात ही प्रक्रिया सुरळीतपणे पार पाडण्याची जबाबदारी निवडणूक आयोगाकडे सोपवली आहे. राज्यघटनेच्या कलम ३२४-अ नुसार, २५ जानेवारी १९५० रोजी या आयोगाची स्थापना झाली. निवडणुकांचे वेळापत्रक तयार करणे, उमेदवारांच्या अर्जांची छाननी, मतदानाच्या दिवशीचे नियोजन आणि निकाल जाहीर करण्यापर्यंत सर्व जबाबदार्या आयोगाच्या. निकषांनुसार राजकीय पक्षांना मान्यता देणे, नियमभंग झाल्यास मान्यता रद्द करणे, राजकीय पक्षांना चिन्हवाटप आणि याबाबतच्या तंट्यांचे निवारण, ही कामेही आयोगच करतो. सुकुमार सेन देशाचे पहिले निवडणूक आयुक्त, तर एस. रमादेवी हे पद सांभाळणार्या पहिल्या महिला. देशाचे मुख्य निवडणूक आयुक्त म्हणून टी. एन. शेषन यांची कामगिरी खूप गाजली. त्यांची तेजस्वी परंपरा त्यानंतरच्या काळात कायम राहिली का, याचा शोध घेणेही गरजेचे. भारतासारख्या विशाल देशात निवडणुका सुरळीतपणे पार पाडण्याची जबाबदारी वर्षानुवर्षे आयोग पार पाडतो. या निवडणूक प्रक्रियेचा जगभर आदराने गौरव केला जातो. आयोगाबद्दल यापूर्वीही अनेकवेळा तक्रारी झाल्या, तरीही त्यावर टीका करताना संयम व विवेक बाळगण्याची गरज आहे. कारण, शेवटी आयोग ही एक स्वायत्त, घटनात्मक संस्था असून, त्यावर सरसकटपणे आणि निराधार आरोप करणे योग्य नव्हे. मध्यंतरी लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी आयोगावर आरोप केले होते. कर्नाटकात लोकसभा निवडणुकीत एका मतदारसंघात मतचोरी झाल्याचा आरोप त्यांनी केला. बनावट मतदार, खोटे आणि अवैध पत्ते असलेले मतदार, एकाच पत्त्यावर भरमसाट मतदारांची नोंद, अवैध फोटो आणि फॉर्म, सहीचा गैरवापर करणारे मतदार, अशा माध्यमांतून मतचोरी होत असल्याचा आरोप राहुल यांनी केला होता.तत्पूर्वी, महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीच्या वेळी अचानकपणे मतदारसंख्या वाढल्याबद्दल त्यांनी गंभीर आरोप केले होते. आता आयोगावर आरोप करणार्या राहुल गांधी यांनी माफी मागावी किंवा पाच दिवसांच्या आत या आरोपांसोबत स्वाक्षरी केलेले प्रतिज्ञापत्र सादर करावे. तसे न केल्यास, हे सर्व आरोप निराधार असल्याचे मानून फेटाळून लावले जातील, असा इशारा मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी दिला आहे. बिहारमधील मतदारयाद्यांच्या विशेष सखोल पडताळणीबाबतही (एसआयआर) राहुल यांनी आक्षेप घेतले असून, त्यालाही आयोगाने उत्तर दिले. मतदारयाद्यांमधील त्रुटी दूर करण्यासाठीची ही मोहीम असून, काही पक्ष त्याबाबत चुकीची माहिती पसरवत आहेत, दुहेरी मतदान आणि मतचोरीचे आरोप तथ्यहीन असून, आयोगापुढे सर्व राजकीय पक्ष समान असल्याचा खुलासा ज्ञानेश कुमार यांनी केला आहे. अर्थात, बिहारमधील 'एसआयआर'बाबत केवळ कॉँग्रेसनेच नव्हे, तर अन्य पक्षांनीही आक्षेप घेतले. लोकसभेत या प्रश्नावर चर्चा करण्याची मागणी सर्व विरोधी पक्षांनी लावून धरली आणि आयोगावर मोर्चाही नेला.




आयोग केंद्र सरकारसाठी काम करत असल्याचा विरोधकांचा आरोप आहे. अर्थात, हा आरोप मोघम स्वरूपाचा असून, कॉँग्रेसच्या काळात भाजपही अशाप्रकारचा आरोप करत असे. मतदारयाद्यांतील सर्व त्रुटी दूर करणे हा 'एसआयआर'चा (मतदारयाद्या पुनरीक्षण) खरा उद्देश आहे; पण याबाबतच्या सर्वच तक्रारी खोट्या म्हणता येणार नाहीत. शिवाय, हे प्रकरण सध्या सर्वोच्च न्यायालयात असून, सुनावणीच्या वेळी न्यायाधीशांनी काही गोष्टींबाबत आयोगाचे कानही टोचले.

'एसआयआर'मध्ये बिहारच्या प्रारूप मतदारयादीतून वगळलेल्या नावांची यादी सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर जिल्हा दंडाधिकार्यांच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध झाली. न्यायालयाच्या आदेशानंतरच आयोगाने ही गोष्ट अंमलात आणली, हे लक्षात घेतले पाहिजे. मात्र, कर्नाटकमध्ये लोकसभा निवडणुकीत एका मतदारसंघात मतचोरी कशी झाली, याचा जो पुरावा राहुल यांनी सादर केला, त्याला यथायोग्य उत्तर आयोगाने दिलेले नाही. शिवाय, राहुल गांधी यांची पत्रकार परिषद संपत असतानाच, आयोगाने त्यांना पत्र पाठवून, केलेले आरोप सिद्ध करावेत, असा आदेश काढला. यापूर्वी इतक्या तातडीने कधीही अशाप्रकारचे प्रति-आव्हान कोणालाही दिले नसावे! मात्र, मी राजकारणी असून, माझा जाहीर शब्द हीच शपथ आहे, असे प्रत्युत्तर देऊन, राहुल यांनी आयोगास आपण जुमानत नसल्याचे दाखवून दिले. एवढेच नव्हे, तर हा आरोप खोटा असल्याचे आयोगानेच सिद्ध करावे, अशी भूमिका कॉँग्रसेने घेतली. म्हणूनच याबाबतचे पटण्याजोगे स्पष्टीकरण आयोगाने दिल्यास, मतदारांच्या मनातील संशय दूर होईल.

आयोगाच्या मदतीने निवडणूक घोटाळे झाले असून, या मतचोरांना केंद्र आणि बिहारच्या सत्तेतून खाली खेचा, असे आवाहन बिहारमधील 'महागठबंधन'च्या नेत्यांनी या पार्श्वभूमीवर केले. राहुल गांधी यांनी बिहारमध्ये 'व्होटर अधिकार यात्रे'ला सुरुवात केली असून, त्यांनी या प्रश्नाचे उघडपणे राजकारण करण्यास सुरुवात केली आहे. भाजपचे खासदार अनुराग ठाकूर यांनीही पत्रकार परिषद घेऊन रायबरेली, कनौज, मैनपुरी, डायमंड हार्बर, कोलाथूर आणि वायनाड या मतदारसंघांत लोकसभा निवडणुकीच्या वेळी घोळ झाल्याचा आरोप केला. त्यामुळे तेथून निवडून आलेल्या नेत्यांनी राजीनामा द्यावा, अशी त्यांची मागणी आहे.

एकप्रकारे आयोगावर त्यांनीही आक्षेपच घेतले असून, त्याबाबत ठाकूर यांनीही कोणते ठोस पुरावे सादर केलेले नाहीत. राहुल यांना आयोगाने दिलेले आव्हान त्याअर्थाने त्यांनाही लागू पडते. मात्र, दोन्ही आघाड्यांवर याबाबत सुरू असलेले राजकारण आणखीनच भडकणार, हे स्पष्ट आहे. बिहार, पश्चिम बंगाल, आसाम आणि केरळात विधानसभा निवडणुका तोंडावर आहेत. साहजिकच, या निवडणुकांमध्ये मतचोरीचा आरोप होण्याची शक्यता आहे. म्हणूनच आयोगाने मतदारयाद्यांबाबत कोणत्याही शंका राहू नयेत, याची दक्षता घेतली पाहिजे. या प्रक्रियेवर बारकाईने लक्ष ठेवण्याची जबाबदारी राजकीय पक्षांची आहे. निकालानंतर तक्रारी करण्यात अर्थ नाही. आयोगाची विश्वासार्हता अबाधित राहणे, हे लोकशाहीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे. आयोगाचा कारभार हा राजकारणाचा विषय होऊ नये, याची काळजी सर्व संबंधितांनी घेतली पाहिजे.

# खाजवून खाजवून हैराण झालात पण केसांतील कोंडा काय जाईना तुमची ही चूक ठरतेय कारणीभूत; स्वतः डॉक्टरांनी दिला सल्ला

धूळ, प्रदूषण, फंगल इन्फेक्शन आणि डर्मेटायटिससारख्या कारणांमुळे टाळूवर डँड्रफची (कोंडा) थर साचू लागते. काहीवेळा यामागे वैद्यकीय कारणे असतात, तर काही वेळा केस व्यवस्थित न धुतल्यामुळेही ही समस्या उद्भवू शकते. अनेकदा असे दिसते की टाळूवरील पांढऱ्या रंगाचा हा पापुद्रा जितका स्वच्छ केला जातो, तितकाच तो पुन्हा तयार होतो. म्हणूनच अनेकांच्या मनात प्रश्न येतो की, डँड्रफपासून कायमचा सुटका होऊ शकते का?



पोटाला सूज आल्यानंतर शरीरात दिसून येतात 'ही' महाभयानक लक्षणे, वारंवार दुर्लक्ष केल्यास उद्भवेल गंभीर समस्या

जर तुम्हाला विचारले गेले की तुम्ही डँड्रफपासून बचावासाठी काय करता, तर बहुतेक लोकांचे उत्तर असेल – अँटी–डँड्रफ शॅम्पू वापरतो. पण हे शॅम्पू वापरूनसुद्धा डँड्रफ पूर्णपणे जात नाही आणि टाळूला सतत खाज येत राहते. त्यामुळे लोक वारंवार डोकं खाजवतात आणि ही समस्या अधिक त्रासदायक होते. जर तुम्हीही अशा समस्येला सामोरे जात असाल, तर यामागे तुमचीच एक चूक असते. चला, याबद्दल सविस्तर जाणून घेऊ.

इंस्टाग्रामवरील प्रसिद्ध त्वचारोग तज्ज्ञ डॉ. जुश्या सरीन यांनी त्यांच्या एका व्हिडिओमध्ये सांगितले की, ज्यांची टाळू ऑइली असते त्यांना डँड्रफची समस्या जास्त प्रमाणात होते. कारण ऑइली स्कॅल्पमध्ये Malassezia Furfur नावाचा यीस्ट जास्त प्रमाणात वाढतो आणि त्यामुळे टाळूवर डँड्रफचे थर साचतात. जर तुमची टाळू आधीच ऑइली असेल, तर वेगळे तेल भरपूर प्रमाणात लावण्याची गरज नाही. असे केल्याने डँड्रफ कमी न होता उलट वाढतो. हलके तेल केसांच्या लांबीवर लागू शकता, पण टाळूत जास्त प्रमाणात तेल चोळणे टाळा. आपल्यातील अनेक जण केसांच्या प्रत्येक समस्येवर तेल लावणे हेच उपाय मानतात, पण हे नेहमी योग्य नसते. स्कॅल्पचा कि संतुलित ठेवा टाळूचा नैसर्गिक कि साधारण ५.५ असतो. तो कमी–जास्त झाला तर डँड्रफ वाढू शकतो. त्यामुळे असा शॅम्पू निवडा ज्यात झळीलींपश जश्रराळपश नावाचे घटक जास्त प्रमाणात असतात, जे डँड्रफ नियंत्रणात ठेवण्यास मदत करतात.

नियमित वापर करा डँड्रफ असताना आणि तो कमी झाल्यानंतरही हा शॅम्पू आठवड्यातून एकदा वापरा. यामुळे टाळूचे आरोग्य टिकून राहील आणि डँड्रफ पुन्हा होण्याची शक्यता कमी होईल.

# रेस्टॉरंट स्टाईल Honey Chili Potato आता घरीच बनवा; तुमच्या पार्टीची शान वाढवेल ही रेसिपी!

हनी चिली पोटॅटो हा एक लोकप्रिय इंडो–चायनीज स्टार्टर आहे जो कुरकुरीत तळलेल्या बटाट्यांना गोड–तिखट सॉसमध्ये टॉस करून बनवला जातो. मधाचा गोडवा, लाल मिरचीची झणझणीत चव आणि सॉसची खमंग टेक्स्चर यामुळे हा डिश मुलांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांनाच आवडतो. पार्टी, गेट–टुगेदर किंवा संध्याकाळच्या स्नॅक्ससाठी ही एकदम योग्य रेसिपी आहे.



घरी कोणता खास प्रसंग असेल किंवा पार्टी असेल तर अशा वेळी तुमची ही रेसिपी घरी बनवू शकता. याच्या कुरकुरीत आणि मसालेदार चवीने सर्वच तुमच्यावर खुश होतील. शिवाय हे बनवायला फार कठीणही नाही, तुम्ही झटपट कमी वेळेत ही रेसिपी तयार करू शकता. चला तर मग जाणून घेऊया यासाठी लागणारे साहित्य आणि कृती.

लागणारे साहित्य:

बटाटे – ३–४ (लांब काप करून)
कॉर्न फ्लोअर – ३ टेबलस्पून
मैदा – २ टेबलस्पून
मीठ – चवीनुसार
मिरी पूड – ट टीस्पून
तेल – तळण्यासाठी

सॉससाठी:

तेल – २ टेबलस्पून
लसूण – ५–६ पाकळ्या (बारीक चिरून)
हिरवी मिरची – २ (उभी चिरलेली)
कांदा – १ (स्लाइस करून)
शिमला मिरची – ट (स्लाइस करून)
टोमॅटो सॉस – २ टेबलस्पून
रेड चिली सॉस – १ टेबलस्पून
सोया सॉस – १ टीस्पून
मध – २ टेबलस्पून
तीळ – १ टीस्पून (भाजलेले)
पाणी – ञ कप

वयाच्या आठव्या– नवव्या वर्षी मुलींना मासिक पाळी का येते? जाणून घ्या यामागील सविस्तर कारणे

कृती

एका बाऊलमध्ये कॉर्न फ्लोअर, मैदा, मीठ, मिरी पूड घालून पाणी टाकून घट्ट पेस्ट तयार करा. त्यात बटाट्याचे काप घालून व्यवस्थित मिक्स करा.

कढईत तेल गरम करून बटाटे कुरकुरीत होईपर्यंत तळा. नंतर टिश्यू पेपरवर काढा.

पॅनमध्ये २ टेबलस्पून तेल गरम करा. त्यात लसूण, हिरवी मिरची टाकून परता. नंतर कांदा व शिमला मिरची टाकून थोडे शिजवा.

टोमॅटो सॉस, रेड चिली सॉस, सोया सॉस, मध आणि थोडे पाणी घालून उकळी आणा.

तळलेले बटाटे सॉसमध्ये टाकून चांगले टॉस करा, जेणेकरून सॉस सर्व बटाट्यांना लागेल.

वरून भाजलेले तीळ टाकून सर्व्ह करा.

बटाटे दोन वेळा तळल्यास जास्त कुरकुरीत होतात.

हनीचे प्रमाण आपल्या आवडीनुसार वाढवू किंवा कमी करू शकता.

# त्वचा कायमच उजळदार आणि फ्रेश ठेवण्यासाठी तांदळाच्या पाण्यात मिक्स करा 'हा' पदार्थ, त्वचेवर येईल तारुण्य

तांदळाचे पाणी त्वचेला लावण्याचे फायदे?

तांदळाचे पाणी आणि मध त्वचेवर लावण्याची सोपी टिप्स?



धावपळीची जीवनशैली, धूळ, माती, प्रदूषण, इत्यादी अनेक गोष्टींचा परिणाम आरोग्यासह त्वचा आणि केसांवर लगेच दिसून येतो. बऱ्याचदा त्वचेसंबंधित समस्या उद्भवू लागल्यानंतर महिला दुर्लक्ष करतात. त्वचेवर आलेले पिंपल्स, फोड आणि मुरूम आल्यानंतर त्वचा अतिशय खराब होऊन जाते. त्वचेवर आलेले पिंपल्स कमी करण्यासाठी महिला बाजारात उपलब्ध असलेले स्किन केअर प्रॉडक्ट वापरले जातात. अनेक महागड्या क्रीम, स्किन केअर, फेसपॅक इत्यादी अनेक गोष्टी लावल्या जातात. मात्र तरीसुद्धा त्वचेवर कोणताच परिणाम दिसून येत नाही. बाजारात अनेक वेगवेगळे स्किन केअर प्रॉडक्ट उपलब्ध असतात. सुंदर आणि मुलायम त्वचेसाठी कोणत्याही महागड्या प्रॉडक्टचा वापर करण्याऐवजी घरगुती उपाय करून त्वचेची काळजी घ्यावी. घरगुती उपाय केल्यामुळे त्वचेवर नैसर्गिक चमक कायम टिकून राहते. यासाठी तांदळाचे पाणी आणि मध अतिशय प्रभावी ठरते.

बाजारात अनेक वेगवेगळे स्किन केअर प्रॉडक्ट उपलब्ध आहेत. पण तांदळाचे पाणी त्वचा सुधारण्यास मदत करते. कोरियन स्किन केअर प्रॉडक्ट तयार करण्यासाठी तांदळाच्या पाण्याचा वापर केला जातो. यामुळे त्वचा सतेज, मुलायम आणि टवटवीत दिसू लागते. चेहऱ्यावरील हरवलेला ग्लो पुन्हा परत मिळवण्यासाठी तांदळाच्या पाण्यात मध मिक्स करून लावावे. यामुळे चेहऱ्यावर वाढलेले डाग आणि पिंपल्स कमी होण्यास मदत होते. तांदळाचे पाणी आणि मध त्वचेसाठी अतिशय उत्तम आहे. चला तर जाणून घेऊया तांदळाचे पाणी आणि मध कसे वापरावे.

तांदळाचे पाणी आणि मध त्वचेसाठी वरदान:

तांदळाचे पाणी त्वचा हायड्रेट ठेवण्यासाठी मदत करते. त्वचेवर वाढलेले टॅनिंग कमी करण्यासाठी तांदूळ आणि मध वापरावे. याशिवाय नॅचरल फेसपॅक म्हणून तुम्ही तांदळाचे पाणी वापरू शकता. यासाठी वाटीमध्ये तयार केलेले तांदळाचे पाणी घेऊन त्यात मध मिक्स करून घ्या. तयार केलेले मिश्रण संपूर्ण चेहऱ्यावर लावून काहीवेळ तसेच ठेवा. यामुळे टॅनिंग कमी होईल आणि त्वचा सुंदर दिसेल. सकाळी झोपेतून उठल्यानंतर तांदळाच्या पाण्याचे मिश्रण त्वचेवर लावल्यास त्वचा हायड्रेट राहील. तांदळाचे पाणी त्वचेवर लावून हलक्या हाताने मसाज करा. त्यानंतर ३० मिनिटं ठेवून नंतर पाण्याने त्वचा स्वच्छ धुवून टाका.

# तोंडाला सुटेल पाणी! श्रावण महिन्यातील उपवासाला झटपट बनवा उपवासाची झणझणीत मिसळ, नोट करून घ्या रेसिपी

सणांचा महिना म्हणून श्रावण महिन्याची खास ओळख आहे. या महिन्यात व्रत, पूजा, उपवास तर अनेक ठिकाणी सत्यनारायण पूजा केली जाते. श्रावणातील प्रत्येक सामोवारी महिलांसह पुरुषसुद्धा उपवास करतात. उपवासाच्या दिवशी फळे किंवा साबुदाण्यांपासून बनवलेले पदार्थ खाल्ले जातात. पण नेहमीच साबुदाणे खाऊन कंटाळा आल्यानंतर घरी झटपट उपवासाची मिसळ बनवू शकता. नेहमीच झणझणीत तिखट आणि कडधान्यांचा वापर करून मिसळ बनवली जाते. पण उपवास केल्यानंतर झणझणीत पदार्थ खाण्याची इच्छा झाल्यास तुम्ही घरी मिसळ बनवू शकता. उपवासाची मिसळ बनवताना त्यात लसूण, कांदा किंवा कोणत्याही कडधान्यांचा वापर केला जात नाही. तर ही मिसळ बनवताना शेंगदाणे आणि बटाटा वापरला जातो. उपवास केल्यानंतर कायमच फळे, मिल्कशेक किंवा ज्युस बनवून प्यायले जातात. पण कायमच या पदार्थांचे सेवन करण्याऐवजी उपवासाचे चमचमीत पदार्थ बनवून खावेत. चला तर जाणून घेऊया उपवासाची मिसळ बनवण्याची सोपी रेसिपी.





साहित्य:

खोबऱ्याचा किस
शेंगदाणे
तूप
जिरं
हिरवी मिरची
दही बटाटा साबुदाणा उपवास बटाट्याची भाजी फराळी चिवडा कोथिंबीर डाळिंबाचे दाणे

कृती:

उपवासाची मिसळ बनवण्यासाठी सर्वप्रथम, कढईमध्ये तूप गरम करून त्यात जिरं, कढीपत्त्याची पाने आणि हिरव्या मिरचीचे तुकडे घालून मिक्स करा. त्यानंतर त्यात तयार केलेली ओल खोबर आणि शेंगदाण्याची पेस्ट टाकून व्यवस्थित मिक्स करून घ्या. वाटण व्यवस्थित भाजल्यानंतर त्यात चवीनुसार मीठ टाका. त्यानंतर त्यात आवश्यकतेनुसार पाणी टाकून उकळी काढा. आमटीला एक उकळी आल्यानंतर त्यात भिजवून वाफवलेले शेंगदाणे, उकडून मॅश केलेला बटाटा, भिजवलेला साबुदाणा आणि चमचाभर दही घालून मिक्स करून घ्या. आमटी व्यवस्थित शिजल्यानंतर त्यात गॅस बंद करून घ्या. मोठ्या वाटीमध्ये पवासाची बटाटा भाजी घेऊन त्यावर तयार केलेली मिसळ टाकून वरून फराळी चिवडा, कोथिंबीर आणि डाळिंबाचे दाणे टाकून सर्व्ह करा. तयार आहे सोप्या पद्धतीमध्ये बनवलेली उपवासाची झणझणीत मिसळ. हा पदार्थ घरातील सगळ्यांचं खूप जास्त आवडेल.

# जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर–घुगे यांची पूरग्रस्त गावांना भेट;नुकसानीचे पंचनामे, उपाययोजनांचा घेतला आढावा

लातूर, दि. २० : जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर–घुगे यांनी आज उदगीर तालुक्यातील पूरग्रस्त मौजे बोरगाव बुद्रुक, धडकनाळ आणि टाकळी या गावांना भेट देऊन पूरग्रस्त भागातील शेती, घरांचे नुकसान आणि इतर बाधित क्षेत्रांची प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी त्यांनी प्रशासनाची बैठक घेऊन पंचनामे, उपाययोजना आणि नागरिकांच्या आरोग्य सुविधांबाबत आढावा घेतला.

जिल्हाधिकाऱ्यांनी बोरगाव येथील तानाजी धोंडीबा सुभाने, हनुमंत अर्जुन सुभाने आणि रमेश अर्जुन सुभाने यांच्या घरांना भेट देऊन पाहणी केली, जिथे तीन ते चार फूट पाणी साचले होते. त्यांनी गावकऱ्यांना प्रशासनाच्या सर्व उपाययोजनांची माहिती देऊन आश्वस्त केले. पीक नुकसानी, मृत जनावरे, पडझड झालेली घरे आणि इतर नुकसानीचे पंचनामे तातडीने पूर्ण करून पात्र लाभार्थ्यांना सानुग्रह अनुदान त्वरित वितरित करण्याचे निर्देश त्यांनी दिले.



बोरगाव आणि धडकनाळ गावातील विद्युत पुरवठा आजच सुरळीत करण्याच्या सूचना देतानाच, गावात अस्वच्छतेमुळे रोगराई पसरणार नाही यासाठी आवश्यक वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्याच्या सूचना जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर–घुगे यांनी दिल्या. विविध सेवाभावी संस्था आणि व्यक्तींनी पूरग्रस्तांना केलेल्या मदतीचे त्यांनी कौतुक केले.

यावेळी उपविभागीय अधिकारी सुशांत शिंदे, तहसीलदार राम बोरगावकर, महावितरणचे मुख्य अभियंता अरविंद बुलबुले, अधीक्षक अभियंता प्रशांत दाणी, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बालाजी शिंदे, गट विकास अधिकारी प्रवीण सुरडकर, उपविभागीय कृषी अधिकारी श्री. यादव, जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. श्रीधर शिंदे यांच्यासह तालुका कृषी अधिकारी व इतर संबंधित अधिकारी उपस्थित होते.

# गणेशोत्सव, ईद–ए–मिलाद शांततेत साजरे करून सामाजिक एकोपा जपूया !–जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर–घुगे

लातूर, दि. २० : आपल्या जिल्ह्याची शांतताप्रिय जिल्हा अशी ओळख आहे. सर्वधर्मीय सण, उत्सव आतापर्यंत उत्साहाने आणि सामाजिक सलोखा जपत साजरे झाले आहेत. हीच वैभवशाली परंपरा कायम ठेवत यंदाचा पोळा, गणेशोत्सव आणि ईद–ए–मिलाद शांततामय व उत्साहपूर्ण वातावरणात साजरे करावेत, असे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर–घुगे यांनी केले. दयानंद सभागृहात आयोजित शांतता समितीच्या बैठकीत त्या बोलत होत्या. यावेळी पोलीस प्रशासनातर्फे 'माझं लातूर, सुरक्षित लातूर' हा अभिनव उपक्रम राबवला जाणार असून, यात जास्तीत जास्त गणेशोत्सव मंडळांनी सहभागी व्हावे, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.




या बैठकीस जिल्हा पोलीस अधीक्षक अमोल तांबे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना, लातूर महानगरपालिका आयुक्त मानसी, अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण, उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे–विरोळे, सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांचे पदाधिकारी आणि मुस्लिम बांधव उपस्थित होते.

जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर–घुगे म्हणाल्या, गणेशोत्सवात ऑपरेशन सिंदूर, स्वदेशी आदी विषयांवर देखावे सादर करावेत. नाविन्यपूर्ण संकल्पना राबवून पर्यावरण संवर्धनाचा संदेश द्यावा. सर्वधर्मीयांनी एकत्र येऊन सामाजिक विश्वास दृढ करावा. गतवर्षी लातूरच्या गणेशोत्सव मंडळाला राज्यस्तरीय तृतीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले होते. यंदा प्रथम क्रमांक मिळवण्यासाठी सामाजिक संदेश देणारे उत्कृष्ट देखावे सादर करावेत. डॉल्बीमुक्त गणेशोत्सवासाठी सहकार्य करण्याचे आणि पारंपारिक वाद्यांचा वापर करण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले. गणेशोत्सव आणि ईद–ए–मिलाद साजरे करताना सर्वांनी नियमांचे काटेकोर पालन करावे आणि पर्यावरणपूरक उत्सव साजरे करावेत, असेही त्या म्हणाल्या. जिल्हा प्रशासन उत्सवकाळात आवश्यक सुविधा उपलब्ध करेल, असे त्यांनी आश्वासित केले.

पोलीस प्रशासन राबविणार 'माझं लातूर, सुरक्षित लातूर' उपक्रम

जिल्ह्यातील वृक्ष लागवड चळवळीला गती देण्यासाठी जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर–घुगे यांनी सुरु केलेल्या 'माझं लातूर, हरित लातूर' उपक्रमाच्या धर्तीवर जिल्हा पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी 'माझं लातूर, सुरक्षित लातूर' हा उपक्रम जाहीर केला. प्रत्येक गणेशोत्सव मंडळाने आपल्या मंडपात किमान चार सीसीटीव्ही कॅमेरे लावावेत, असे आवाहन त्यांनी केले. उत्सव संपल्यानंतर हे कॅमेरे परिसरातील चौकात लावावेत आणि पुढील उत्सवात पुन्हा मंडपात वापरावेत. यामुळे लातूर शहरात ५ हजारपेक्षा जास्त कॅमेरे लागतील, ज्यामुळे सुरक्षेला बळ मिळेल. डॉल्बीवरील खर्च टाळून मंडळांनी या उपक्रमात सहभागी व्हावे, असे जिल्हा पोलीस अधीक्षक श्री. तांबे म्हणाले. जास्त कॅमेरे लावणाऱ्या मंडळांचा तालुका, उपविभाग आणि जिल्हास्तरावर सन्मान केला जाईल, असे त्यांनी सांगितले.

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार आवाजाच्या मर्यादेचे पालन करावे. डॉल्बी लावण्यास परवानगी नसून, मर्यादा ओलांडल्यास कठोर कारवाई होईल, असे जिल्हा पोलीस अधीक्षक श्री. तांबे यांनी स्पष्ट केले. मुस्लिम बांधवांनी ईद–ए–मिलादची मिरवणूक गणेशोत्सवानंतर काढण्याचा निर्णय घेतल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. तसेच, सर्वधर्मीयांनी सण–उत्सव शांततेत आणि नियम पाळून साजरे करावेत, असे आवाहन केले. कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी एक मंडळ, एक अंमलदार संकल्पनेतून प्रत्येक मंडळासाठी समन्वयक अंमलदार नेमला जाईल, असे त्यांनी सांगितले.

ग्रामीण भागात 'एक गाव–एक गणपती' संकल्पना

ग्रामीण भागात 'एक गाव–एक गणपती' संकल्पना राबवली जाईल. ग्रामपंचायतीमार्फत मंडळांना आवश्यक सुविधा पुरवल्या जातील. कायदा व सुव्यवस्थेसाठी पोलीस प्रशासन आणि ग्रामपंचायतींमध्ये समन्वय राहील, असे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना यांनी सांगितले.

गणेशोत्सव मंडळांना अधिकाधिक सुविधा देण्यासाठी महानगरपालिका प्रयत्नशील

लातूर शहरातील गणेशोत्सव मंडळांनी मांडलेल्या अडचणींची नोंद घेण्यात आली आहे. याबाबत गुरुवारी बैठक घेऊन तातडीने कार्यवाही केली जाईल. मंडळांना जास्तीत जास्त सुविधा देऊन उत्सव उत्साहात साजरा होईल, यासाठी महानगरपालिका प्रयत्नशील आहे, असे आयुक्त श्रीमती मानसी यांनी सांगितले.

सर्वोच्च न्यायालयाच्या २०१० च्या मंडप उभारणीविषयक आदेशांचे पालन करण्याचे आवाहन उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे–विरोळे यांनी केले. अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांनीही आपले विचार मांडले. बैठकीत गणेशोत्सव मंडळांचे पदाधिकारी आणि मुस्लिम बांधवांनी सूचना मांडल्या. उदगीरचे उपविभागीय अधिकारी गजानन भातलवंडे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# स्व. विश्वंभर ( काका ) कोकिळ यांच्या आठव्या पुण्यस्मरणार्थ मराठवाडा पातळीवरील भव्य शालेय वक्तृत्व स्पर्धा संपन्न

## लहान गटातून आदर्श प्रा. वि. घाटनांदुर शाळेचा अर्णव सारडा तर मोठ्या गटातून स्वामी विवेकानंद शाळेचा हरी चौरे यांनी सर्वप्रथम येण्याचा बहुमान मिळविला.

केज प्रतिनिधी:– जीवन विकास शिक्षण मंडळ, केज तसेच कोकिळ परिवार यांच्या संयुक्त विद्यमाने जीवन विकास शिक्षण मंडळ संस्थेचे संस्थापक सचिव स्व. विश्वंभर ( काका ) कोकिळ यांच्या ८ व्या पुण्यस्मरणार्थ मराठवाडा पातळीवरील भव्य शालेय वक्तृत्व स्पर्धा केज येथील स्वामी विवेकानंद विद्यामंदीर माध्यमिक विभाग या शाळेमध्ये दि. २० ऑगस्ट २०२५ वार बुधवार रोजी पार पडली. या स्पर्धेमध्ये लहान गटातून आदर्श प्राथमिक विद्यालय घाटनांदुर या शाळेचा विद्यार्थी अर्णव दत्तप्रसाद सारडा तर मोठ्या गटातून स्वामी विवेकानंद विद्यामंदिर मा. वि. केज शाळेचा विद्यार्थी हरी रामप्रसाद चौरे यांनी सर्वप्रथम येण्याचा बहुमान मिळविला. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून जी. बी. गदळे सचिव, जीवन विकास शिक्षण मंडळ केज. तर बक्षीस वितरण समारंभ सत्राचे अध्यक्ष म्हणून अंकुशरावजी इंगळे अध्यक्ष जीवन विकास शिक्षण मंडळ केज, तसेच प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य डॉ. हनुमंत सौदागर प्राचार्य, भाऊसाहेब पाटील अध्यापक महाविद्यालय केज. इतर मान्यवर उपस्थितीमध्ये संस्थेचे सहसचिव तथा स्वामी विवेकानंद इंग्लिश स्कूलचे मु. अ. उपेंद्र कोकिळ, सेवानिवृत्त शिक्षक हनुमंत घाडगे, शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा शैलाताई इंगळे, शाळेच्या मुख्याध्यापिका शिवनंदा मुळे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीस उपस्थित मान्यवरांच्या हस्ते प्रतिमा पूजन व दीपप्रज्वलन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रस्ताविक व पाहुण्यांचा परिचय मेघशाम मंगरूळकर यांनी दिला. याप्रसंगी ते म्हणाले, विश्वंभर कोकिळ यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे एक जबाबदार स्वयंसेवक म्हणून कार्य केले. शिक्षणक्षेत्रापासून वंचित राहणाऱ्या समाजातील पारधी मुलांसाठी वस्तीगृहे उभी केली. स्थानिक वाचनालयाची जबाबदारी स्वीकारत त्यांनी जिल्हा ग्रंथालयाचे प्रमुख म्हणून देखील जबाबदारी पार पाडली. केज शहर व आसपासच्या परिसरात सर्वोत्कृष्ट शिक्षण विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी १९८४ साली जीवन विकास शिक्षण मंडळ केज या संस्थेची स्थापना केली. इ.स. २००० पासून उत्कृष्ट वक्त्यांचे विचार समाजात रुजविण्यासाठी व्याख्यानमालेची सुरुवात केली. सांस्कृतिक क्षेत्रात देखील योगासन वर्ग, शिवप्रतिष्ठाणमार्फत दुर्गादौड, छत्रपती संभाजीराजे बलिदान मास, गणेश मंदीराची निर्मिती, तसेच रक्तदान शिबीराचे आयोजन करून आरोग्याविषयीची जागरुकता दाखवली. याप्रसंगी सेवानिवृत्त सहशिक्षक हनुमंत घाडगे यांनी आपले विचार व्यक्त केले. ते म्हणाले, 'वृक्ष लाऊनिया निघुनी जाती' या उक्तीप्रमाणे कार्य करणारे व जीवन जगणारे स्व. विश्वंभर काका होते. त्यांनी स्थापन केलेल्या 'जीवन विकास शिक्षण मंडळ' या संस्थेचे वटवृक्षात रूपांतर झाले आहे. ते एक रत्नपारखी व्यक्तीमत्त्व होते व उपक्रमशीलता हा त्यांचा स्वभाववैशिष्ट्यांपैकी एक गुण होता. केवळ शैक्षणिक क्षेत्रातच नव्हे तर क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्रातही आपल्या शाळेतील विद्यार्थ्यांनी यश मिळवून नाव कमवावे असा त्यांचा विचार होता व या विचारातूनच आजच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. याप्रसंगी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे प्राचार्य हनुमंत सौदागर म्हणाले, सदरील वक्तृत्व स्पर्धेसाठी निवडलेल्या 'मरावे परी किर्तीरूपी ऊरावे आणि 'सामाजिक समतेविषयी माझी भूमिका' या दिलेल्या विषयांची याप्रसंगी त्यांनी व्यापकता स्पष्ट केली. लहान वर्गाच्या विषयाबद्दल बोलताना ते म्हणाले. तुका म्हणे एका उत्तमची सरे । उत्तमची उरे किर्तिमागे । या संत तुकारामांच्या ओवीप्रमाणे स्व. विश्वंभर काकांचे जीवन होते. हा विषय निवडून आपल्याला त्यांच्या जीवनाच्या उत्कृष्टतेची आठवण होते. मोठ्या वर्गाचा विषय म्हणजेच 'सामाजिक समतेविषयी माझी भूमिका' हा केवळ बोलण्याचा विषय नसून तो विद्यार्थ्यांनी प्रत्यक्षात आचरणात आणव्याचा आहे. अध्यक्षीय समारोपात जी. बी. गदळे म्हणाले, विश्वंभर



काका हे केवळ संस्थापकच नव्हे तर आधारस्तंभही होते, आजही विश्वंभर काकांच्या शिस्तीने चालणाऱ्या शाळेसाठी विना–अपेक्षेने कार्य करणारे शिक्षक व त्यांचा त्याग ही कारणे आहेत. अशा होऊन गेलेल्या महान व्यक्तीमत्त्वांच्या कार्याची जाणीव होण्यासाठी असे उपक्रम राबवले जातात.

ही स्पर्धा ५ वी ते ७ वी तसेच ८ वी ते १० वी या दोन गटात पार पडली. या स्पर्धेमध्ये एकूण चोवीस शाळांनी सहभाग नोंदवला होता. याप्रसंगी लहान गटासाठी परीक्षक म्हणून प्रा. बाबासाहेब हिरवे वसंत महाविद्यालय केज, बाबासाहेब शिनगारे माजी मुख्याध्यापक जयभवानी विद्यालय लोखंडीसावरगाव, सेवानिवृत्त प्राचार्य अभिमन्यू पुजदेकर युसुफवडगाव माध्यमिक विद्यालय युसुफवडगाव, यांनी काम पाहिले. तर मोठ्या गटासाठी प्रा. डॉ. हनुमंत सौदागर प्राचार्य भाऊसाहेब पाटील अध्यापक महाविद्यालय केज, हनुमंत घाडगे सेवानिवृत्त शिक्षक, जनार्दन सोनवणे माजी सैनिक यांनी काम पाहिले. पहिला गट इयत्ता ५ वी ते ७ वी– वक्तृत्व स्पर्धेचा विषय मरावे परी कीर्तीरूपी उरावे या स्पर्धेमध्ये लहान गटातून आदर्श प्राथमिक विद्यालय घाटनांदुर या शाळेचा विद्यार्थी अर्णव दत्तप्रसाद सारडा याने सर्वप्रथम येण्याचा बहुमान मिळविला. द्वितीय– यशश्री महादेव नेहरकर जि. प. पिसेगाव, तृतीय– स्वस्तीका दिनकर राऊत युसूफवडगांव मा. व उच्च मा. वि. युसूफवडगाव, उत्तेजनार्थ– आर्या राजेंद्र लटपटे स्वामी विवेकानंद विद्यामंदिर मा.वी. केज.

दुसरा गट इयत्ता ८ वी ते १० वी वक्तृत्व स्पर्धे चा विषय सामाजिक समतेसाठी माझी भूमिका या स्पर्धेमध्ये मोठ्या गटातून स्वामी विवेकानंद विद्यामंदिर मा. वि. या शाळेचा विद्यार्थी हरी रामप्रसाद चौरे याने सर्वप्रथम येण्याचा बहुमान मिळविला. द्वितीय– सोफिया पाशा सय्यद नूतन माध्यमिक विद्यालय अंजनडोह, तृतीय– श्रावणी अनंत फावडे जनता माध्यमिक विद्यालय धारूर, उत्तेजनार्थ– सृष्टी तुकाराम खरटमोल जोधा प्रसादजी मोदी माध्यमिक विद्यालय आंबेजोगाई इत्यादी. तसेच सर्व विजेत्या विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देण्यात आले. याप्रसंगी आंबेजोगाई शिक्षक रामेश्वर माले, तसेच अभिमन्यू पूजदेकर, जनार्दन सोनवणे, प्राचार्य हनुमंत सौदागर, बाबासाहेब शिनगारे या परीक्षकांनी स्पर्धेच्या शिस्त, परिश्रम व आयोजनाचे कौतुक केले. तसेच केज सारख्या शाळेमध्ये दर्जेदार विद्यार्थी घडतातच कसे हे प्रत्यक्ष आज अनुभवले. कार्यक्रमाच्या दुसऱ्या सत्रात जीवन विकास शिक्षण मंडळ संस्थेचे अध्यक्ष अंकुशरावजी इंगळे यांनी अध्यक्षपद भूषविले. याप्रसंगी ते म्हणाले, या संस्थेचे संस्थापक सचिव विश्वंभर कोकिळ यांनी कधीही स्वतःचा व्यक्तिगत स्वार्थ न ठेवता सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रामध्ये अतिशय महत्त्वाचे योगदान दिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रबोधकांत समुद्रे यांनी केले. तर आभार शाळेच्या मुख्याध्यापिका शिवनंदा मुळे यांनी मानले.

# माजी मंत्री आमदार संजय बनसोडे यांचा 'महाराष्ट्ररत्न पुरस्कार' देवून सन्मान

## माजी मंत्री आमदार संजय बनसोडे यांच्या कार्याचा लंडनमध्ये गौरव

उदगीर : राज्याचे माजी क्रीडा व युवक कल्याण, बंदरे मंत्री तथा उदगीर – जळकोट मतदार संघाचे आमदार संजय बनसोडे यांच्या कार्याची दखल घेऊन लोकमत समूहातर्फे 'महाराष्ट्ररत्न पुरस्कार' मान्यवरांच्या उपस्थितीत लंडन येथे मान्यवरांच्या उपस्थितीत प्रदान करण्यात आला. आ.संजय बनसोडे यांनी, पहिल्यांदा निवडून येवुन मतदार संघाचा मागील २५ वर्षाचा बॅकलॉग भरुन काढला. उदगीर व जळकोट येथे प्रशासकीय इमारत, शासकीय विश्रामगृह, मराठा भवन, लिंगायत भवन, बुध्द विहार, शादीखाना, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यालय, तिरु नदीवरील बॅरेजेस, महावितरणे कार्यालय, ग्रामीण रूग्णालये, महापुरुषांचे पुतळे, जळकोट व उदगीर शहराला राष्ट्रीय महामार्गाने जोडणारे सर्व रस्ते, विविध वाडी तांड्यावर योजना पोहचवल्या, कायमस्वरुपी पाण्याचा प्रश्न मिटवण्यासाठी वॉटरग्रीड योजना आणली. भविष्यातील




बेरोजगारीचा विचार करुन उदगीर व जळकोटच्या एम.आय.डी. सी. चा प्रश्न मार्गी लावुन येथील बेरोजगार तरूणांना रोजगार उपलब्ध करुन देण्याचा निर्धार त्यांनी केला आहे. त्यांच्या याच कामाची पावती म्हणून मतदार संघातील जनतेने दुस–यांदा त्यांना ९३ हजारापेक्षा जास्त मताधिक्य देवून विजयी केले. त्याच याच कार्याची दखल घेवुन त्यांना महाराष्ट्र रत्न पुरस्कार देवून त्यांचा गौरव करण्यात आला आहे. या पुरस्कार वितरण समारंभास शुभहस्ते आणि महाराष्ट्राचे मंत्री मंगलप्रभातजी लोढा, मंत्री ना.पंकजाताई मुंडे, सिनेअभिनेते सुनिल शेट्टी, अमृता फडणवीस, लोकमत मिडीया ग्रुपचे चेअरमन डॉ. विजय दर्डा, समुहाचे एडिटर चीफ राजेंद्र दर्डा, ज्याईंट एम.डी. ऋषी दर्डा, यांच्या प्रमुख उपस्थितीत हा मानाचा पुरस्कार आ.संजय बनसोडे यांना देण्यात आला. माजी मंत्री आमदार संजय बनसोडे यांना सदर पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

# राष्ट्रीय वैज्ञानिक दिन साजरा



लातूर ---महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती शाखा लातूरच्या वतीने शहीद डॉक्टर नरेंद्र दाभोलकरांचा बारावा स्मृती दिवस राष्ट्रीय वैज्ञानिक दिवस म्हणून साजरा करण्यात आला क्रीडा संकुल जेष्ठ नागरीक संघाच्या कार्यालयात समितीचे अध्यक्ष कॅप्टन प्राध्यापक डॉक्टर बाळासाहेब गोडबोले यांच्या हस्ते डॉक्टर नरेंद्र दाभोळकरांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून सर्व कार्यकर्त्यांनी अभिवादन करून डॉक्टर दाभोलकरांच्या कार्यावर व आठवणीवर प्रकाश टाकला प्रत्येक कार्यकर्ता मनोगतात आम्ही दाभोळकर याच भावनेतून प्रेरित आहे याच भावनेतून मनोगत व्यक्त करीत होते मनोगतात प्रकाश घादगिने, वसंत टेकाळे, प्राध्यापक रामकिशन समुखराव, प्राध्यापक एम.बी पठाण, पंकज जयस्वाल, नरसिंग इंगळे, प्रदीप कांबळे व अध्यक्षीय समारोपात कॅप्टन प्राध्यापक डॉक्टर बाळासाहेब गोडबोले यांनी लातूरात व इतरत्र डॉक्टर नरेंद्र दाभोळकरांचा एकही कार्यक्रम सोडला नसल्याचे व त्यांच्या सहवासाने आम्ही अंधश्रद्धा मुक्त झालो आणि समाजामधील अंधश्रद्धा दूर करण्यासाठी झटत राहिलोत दाभोळकरांनी माणूस म्हणून व माणुसकेंद्रित शिकवण आम्हाला दिली पृथ्वी मोलाचा माणूस होऊन गेला त्यांना मनापासून अभिवादन करतो पृथ्वी मोलाचा माणूस भेटला आणि आम्ही घडलो असे प्रतिपादन त्यांनी केले कार्यक्रमास प्रकाश नीला, रमेश भोयरेकर, वसंत भेंडे ,माधवराव सोमवंशी ,नाईक .आदी कार्यकर्त्यांची उपस्थिती होती जिल्हाधिकारी लातूर यांना डॉक्टर नरेंद्र दाभोलकर यांच्या खुनाचा सूत्रधार शोधण्याबाबतचे देण्यात येणारे निवेदन प्रकाश घादगिने यांनी सर्वांना वाचून दाखविले व कार्यक्रमानंतर जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात येईल असे सांगितले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रकाश घादगिने राज्य कार्यकारी समिती सदस्य यांनी केले तर आभार पंकज जयस्वाल कार्याध्यक्ष आणि मानले.

# अक्षय जाधव यांचे नीट पीजी मध्ये घवघवीत यश



केज/प्रतिनिधी केज येथील भूमिपुत्र अक्षय अविनाश जाधव यांनी नीट पीजी करिता ऑल इंडिया रँक १५६९ क्रमांक मिळवला आहे. संभाजीनगर घाटी इथे शिक्षण घेताना ही रँक मिळवली आहे. पुढील वैद्यकीय शिक्षणासाठी ही गुणवत्ता महत्त्वाची ठरणार आहे. त्यांनी मिळवलेल्या यशाबद्दल खा.रजनीताई अशोकराव पाटील, माजी मंत्री अशोकराव पाटील माऊली विद्यापीठाचे सचिव आदित्य दादा पाटील,प्रशासकीय अधिकारी प्रताप मोरे यांनी अभिनंदन करून पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना भरीव मदत करून धीर द्या : काँग्रेसचे प्रवक्ते तथा माजी आमदार धिरज देशमुख यांची राज्य सरकारकडे मागणी

लातूर :– गेल्या पाच दिवसात झालेल्या अती मुसळधार पावसामुळे मराठवाड्यासह राज्यभरातील शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. त्यामुळे तातडीने पंचनामे पूर्ण करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना व ग्रामस्थांना भरीव आर्थिक मदत करावी व त्यांना या अडचणीच्या काळात धीर द्यावा अशी मागणी काँग्रेसचे प्रवक्ते तथा माजी आमदार श्री धिरज विलासराव देशमुख यांची राज्य सरकारकडे केली काँग्रेसचे प्रवक्ते तथा माजी आमदार श्री धिरज विलासराव देशमुख यांनी मुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री श्री अजित पवार, उपमुख्यमंत्री श्री एकनाथ शिंदे, कृषीमंत्री श्री दत्तात्रय भरणे, पालकमंत्री श्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांना पत्र देऊन राज्यातील आणि लातूर जिल्ह्यातील अतिवृष्टीकडे लक्ष वेधले मागील पाच ते सहा दिवसात झालेल्या पावसामुळे राज्यात १४ लाख एकरावरील पिकांचे मोठे नुकसान झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. मराठवाड्यातही पिकांच्या नुकसानीचा आकडा मोठा आहे. येथे तब्बल ३ लाख ५८ हजार हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले आहे. पिकांना फटका बसण्याबरोबरच अतिवृष्टी व पुरामुळे मराठवाड्यातील अनेक जनावरे वाहून गेली आहेत. आत्तापर्यंत ४९८ जनावरे दगावल्याची माहिती आहे अतिवृष्टीमुळे गेल्या काही दिवसात मराठवाड्यातील १३ शेतकऱ्यांना आपला जीव गमवावा लागला आहे. अनेक घरांची पडझड झाली आहे. त्यामुळे ५८८ जणांचा संसार उघड्यावर आला आहे. मराठवाड्यासह राज्यात झालेल्या या नुकसानीची गंभीर्याने दखल घेऊन नुकसानग्रस्त शेतकरी बांधवांना, ग्रामस्थांना आणि मृतांच्या कुटुंबियांना राज्य सरकारने तातडीने आर्थिक मदत करावी अशी मागणी काँग्रेसचे प्रवक्ते तथा माजी आमदार श्री धिरज विलासराव देशमुख यांनी आपल्या पत्रात नमूद केली आहे

# कुरेशी समाज बांधवांच्या वतीने विविध मागण्याचे केज तहसीलदार यांना निवेदन

## कुरेशी समाज बांधवांच्या मागणीला शेकाप, भीमशक्ती संघटना, दलित अन्याय अत्याचार निर्मुलन समितीचा जाहीर पाठिंबा

केज/प्रतिनिधी :– अल–जमीयतुल कुरेश केज, व केज येथील सर्व कुरेशी समाज बांधवांच्या वतीने विविध मागण्याचे लेखी निवेदन केज तहसीलदार यांना दिले आहे. कुरेशी समाज बांधवांच्या मागणीला शेकाप, भीमशक्ती सामाजिक संघटना, दलित अन्याय अत्याचार निर्मूलन समिती यांनी जाहीर पाठिंबा दिला आहे. याबाबतची सविस्तर माहिती अशी की, जमीयतुल कुरेश, बीड जिल्हा संघटनेचे सर्व पदाधिकारी व सर्व कुरेशी समाज बांधव हा पारंपारिकपणे कायद्याच्या अधीन राहून म्हैस व बैल यासारख्या कृषी जनावरांच्या खरेदी विक्री व्यवसायात सलग्न आहे. कुरेशी समाज बांधव हे कृषी उत्पन्न बाजार समितीचे दाखले, वाहतूक परवाना, पशुवैद्यकीय तपासणी प्रमाणपत्र आधी सर्व कायदेशीर बाबींचे पालन महाराष्ट्र शासनाच्या नियमा नुसार नियमितपणे करत आहोत. परंतु अलीकडील काळात काही संघटना व व्यक्ती या कुरेशी समाजास अतिरेकी पद्धतीने अन्याय करत आहेत. कुरेशी समाज बांधवांना रस्त्यावर आडवुन जातीवाचक व अश्लील शिवीगाळ करून मारहाण करणे व मॉबलिचिंग सारखे गंभीर प्रकार कुरेशी समाजासोबत घडत आहेत. कुरेशी समाजा सोबत सतत घडणाऱ्या घटना पाहता बीड जिल्ह्यातील सर्व कुरेशी बांधवांनी एकमताने एक मुखी निर्णय घेतला असून यापुढे सर्व प्रकारचे जनावरांचा बाजार बंद व कोणत्याही प्रकारचे जनावरांची खरेदी विक्री करणे बंद केले असून सदर व्यवसाय बंद करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. यामुळे महाराष्ट्रातील शेतकरी, व्यापारी यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होत आहे व झालेले आहे. मस्त एक्सपोर्टच्या कंपन्या बंद पडत आहे याचा मोठा फटका राज्याच्या तिजोरीला बसत आहे आणि या व्यवसायापासून आपला भारत देश जगात सर्वात जास्त बीफ एक्सपोर्ट करणारा दुसऱ्या क्रमांकाचा देश आहे. परंतु सदर समाजावर अन्याय सुरूच राहिला व मागण्या पूर्ण नाही झाल्या तर हा समाज खरेदी विक्री करणार नाही. कुरेशी समाज बांधवांनी केलेल्या मागण्या, आर्थिक व्यवहार पारदर्शक करण्यासाठी रलि कृषी उत्पन्न बाजार समिती ऑनलाईन प्रणालीचे अनिवार्यकरण, राज्यभर एकसमान सेल्स शुल्क व व्यापारी लायसन्सची वेळेत वितरण, वाहतूक परवण्याचे ऑनलाइन त्वरित वितरण करण्यात यावे, शासकीय स्टॉलटर हाऊसची निर्मिती प्रत्येक स्थानिक पातळीवर करण्यात यावी, कोंडवाडा सुविधा विभागानुसार त्वरित सुरू करण्यात यावी, बेकायदेशीर व विनापरवाना गोरक्षण केंद्रे तात्काळ बंद करण्यात यावी, कथीत गोरक्षका विरुद्ध कडक नियमावली तयार करण्यात यावी, कुरेशी समाज बांधवाकरिता आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्यात यावे या मागणीचे लेखी निवेदन कुरेशी समाज बांधवांच्या व



संघटनेच्या वतीने तहसीलदार केज यांना देण्यात आले आहे. यावेळी कुरेशी समाज बांधवांच्या मागणीला पाठिंबा देताना शेकापचे भाई मोहन गुंड, भीमशक्ती सामाजिक संघटनेचे मराठवाडा अध्यक्ष चंद्रकांत खरात सर, केज तालुका दलित अन्याय अत्याचार निर्मूलन समितीचे लखन हजारे यांनी शेतकरी, व्यापारी व कुरेशी समाज बांधवांनी जनावरे खरेदी विक्री सह इतर व्यवसाय बंद करून संप पुकारला आहे त्यामुळे शेतकरी हे अडचणीत सापडले आहेत. शासनांनी तात्काळ शेतकऱ्यांच्या भाकड व निरंथक जनावरांचे सर्वे करून पंचनामे करण्यात यावेत व शेतकऱ्यांना तात्काळ मदत करण्यात यावी, भाकड जनावरे संभाळण्यासाठी शेतकऱ्याकडे मुबलक चारा उपलब्ध नाही व शेतकरी बाकड व निरंक जनावरे सांभाळू शकत नाहीत त्यामुळे बळीराजा सध्या अडचणी सापडल्यामुळे शासनाने सदर प्रकरणाची तात्काळ दखल घेऊन एका भाकड जनावराला दर महिना दहा हजार रुपयाची मदत देण्यात यावी व कुरेशी समाज बांधवांनी केलेल्या मागण्या या रास्त व योग्य आहेत. शासनाने त्यांच्या मागण्याची तात्काळ दखल घ्यावी, व्यापारी, शेतकरी, कुरेशी समाज बांधवांची गोरक्षणाच्या नावाखाली लुट करणाऱ्या विरुद्ध कठोरातल्या कठोर कायद्याची अंमलबजावणी करण्यात यावी अन्यथा सर्व संघटना व पक्ष एकत्र येऊन प्रत्येक तहसील कार्यालयासह शासनाच्या विविध कार्यालयासमोर भाकड जनावरे बांधून संबंध राज्यभर जनआंदोलन उभारणार असल्याचे भाई मोहन गुंड, चंद्रकांत खरात सर,व लखन हजारे यांनी माध्यमांशी बोलताना प्रशासनाला इशारा दिला आहे. सदर मागणीचे लेखी निवेदन हे केज तहसील चे नायब तहसीलदार अशोक भंडारे यांनी स्वीकारले आहे. या लेखी निवेदनावर शेकडो कुरेशी बांधवांच्या स्वाक्षऱ्या आहेत. यावेळी शेकापचे भाई मोहन गुंड, भीमशक्ती सामाजिक संघटनेचे चंद्रकांत खरात सर, दलित अन्याय अत्याचार निर्मूलन समितीचे लखन हजारे यांच्यासह केज तालुक्यासह शहरातील सर्व कुरेशी समाज बांधव, व्यापारी, शेतकरी शेकडोच्या संख्येने उपस्थित होते

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE